माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०३/२०२१/२०२१/११० दिनांक-०९.०४.२०२१

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :०१.०२.२०२१ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :०५.०२.२०२१ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२२.०३.२०२१ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :०९.०४.२०२१ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०३/२०२१**

**अपीलकर्ता:** श्री. जगनसिंह राजपूत

विरुदध

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २८.०१.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०१.०२.२०२१ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक ०५.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपीलार्थी यांनी दिनांक १९.०३.२०२१ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २२.०३.२०२१ रोजी प्राप्त झाले)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २५.०३.२०२१ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०९.०४.२०२१ रोजी सुनावणी आयोजीत केली. अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०४.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना ई-मेल द्वारे 'व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे' सुनावणी घेण्याची विनंती केली त्यानुसार 'व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे' सुनावणी घेण्यात आली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

१) आपल्या कल्याण ग्राहक न्यायमंचामध्ये ग्राहक सदस्य कित्येक वर्षापासून नाही नियमबाध्य ३ महिण्याच्या जास्त ग्राहक सदस्य पद रिक्त ठेवता येत नाही म्हणून आपल्या आयोगाकडून काय कारवाई करण्यात आल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
२) सदरच्या ग्राहक न्यायमंचा मध्ये सदस्य व सचिव चे पद टेंपरवारी चार्ज म्हणून श्री पेवेकर साहेबांना देण्यात आले व त्याच्याकडे कल्याण जोन परिक्षण विभागाचा अतिरिक्त चार्ज ही आहे.न्यायमंचामध्ये सदस्य व सचिव पूर्ण वेळ असणे ग्राहका न्यायदृष्टीने गरजेचे असताना आपल्या आयोगाकडून काय कारवाई सदर बाबत करण्यात आल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
३) आपल्या विज नियामक आयोग महाराष्ट्राच्या नियमाचे पालन विज वितरण कंपनी करत नाही हे न्याय मंचाच्या पदावरून स्पष्ट होते म्हणून आपल्या आयोगाकडून काय कारवाई करण्यात आल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

1) The MERC vide advertisement dated 25th November, 2020 has invited applications for the post of Chairperson and Member(CPO) at various location / zones in Maharashtra for a minimum period of three years on contract basis of 25 posts (Chairperson -13 posts and Member of (CPO) -12 posts) which includes the post of Member (CPO) of the Consumer Grievance Redressal Forum, Kalyan. The last date for submission of application was 9th December, 2020. Currently the appointment is in under process.

२) The copy of Newspaper advertisement and detailed advertisement uploaded on Commission website. which is available in downloadable format on Commission's websites www.merc.gov.in*

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

दिनांक २८.०१.२०२१ रोजी माहिती अधिकाराचे फार्ममध्ये नमुद केलेली माहिती मागितली असता आजपावेतो माहिती मिळालेली नाही म्हणून माहिती बिनामुल्य मिळावी म्हणून प्रथम अपील करण्यात येत आहे.

<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>

अपिलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक निवेदनावरून तसेच अपीलातील मुद्द्यावरून असे दिसून येते कि, अपीलार्थी यांना त्यांच्या माहिती अधिकार अर्जाच्या अन्वये अद्याप माहिती अप्राप्त आहे. तर उलटपक्षी माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना दिनांक ०५.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्यानुषंगाने माहिती अधिकारी यांनी पोष्टाचे पुरावे नमूद केले व ते तपासाअंती योग्य असल्याचे समजते. माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६.०२.२०२१ रोजी व १०:३९ वेळी पोष्टाने

माहिती पाठवीली आहे. अपीलार्थी यांना पोष्टाने पाठविलेली माहिती यशस्वीरित्या पोहोचल्याचे पोष्टाच्या संकेतस्थळारुन स्पष्ट होते.

या उपरोक्त अपीलीय अधिकारी यांना असे निदर्शनास आलेले आहे की, माहिती अधिकार या अर्जामध्ये काय कार्यवाही केल्याचे / व तक्रारवजा अर्ज आहे असे दिसून येते. करिता माहिती अधिकारी यांच्याकडून या विषयी स्वत: उत्तरे देणे अपेक्षित नाही तर, कार्यालयात उपलब्ध असलेले दस्ताऐवज, इत्यादी उपलब्ध करून देणे आहे, करिता माहिती अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे दिसून येते.

वरिल कारण मिमांसेवरून सदर अपील खारिज करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

निर्णय

अपील खारीज करून निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१
मो.नं.९८६०१९७८०८

(अनिलकुमार उके)

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**